पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – २२

**सभावृत्तांत**

दिनांक - **०५/०८/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक **०५/०८/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा. ताकवणे नंदा विकास - सभापती**
**२.** मा. आर.एस.कुमार
३. मा. भारती फरांदे
४. मा. पाडाळे निता विलास
५. मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा. कुटे चारुशीला प्रभाकर

याशिवाय मा.उल्हास जगताप–नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -**

विषय क्र.२) सहाय्यक आयुक्त पदावर पदोन्नती देणेबाबत **–** मा.भारती फरांदे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र.१९ मध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेबाबत- मा.निता पाडाळे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव...

विषय क्र.४) प्रभाग क्र.१७ मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामातुन अ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सर्व प्रभागातील रस्त्यांचे खड्डे व चर भरणेबाबत **–** मा.निता पाडाळे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव...

विषय क्र.५) स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान (से.क्र.२६) याठिकाणी म्युरल बसविणेबाबत - मा.निता पाडाळे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव...

विषय क्र.६) प्रभाग क्र.३ चिखली मध्ये स्वच्छतागृह बांधणेबाबत - मा.निता पाडाळे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव...

विषय क्र.७) मा.नगरसदस्यांचे मानधन वाढविणे व पेन्शन सुरु करणेबाबत **–** मा.नंदा ताकवणे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव...

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.सुरेश म्हेत्रे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक **०५/०८/२०१६** ची पाक्षिक सभा सोमवार, दिनांक **०८/०८/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती –** सोमवार, दिनांक **०८/०८/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **नंदा विकास ताकवणे** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – २२

**सभावृत्तांत**

( दिनांक ०५/०८/२०१६ ची तहकुब सभा )

दिनांक - **०८/०८/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ०५/०८/२०१६ ची तहकूब सभा सोमवार, दिनांक **०८/०८/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा. ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा. आर.एस.कुमार
३. मा. पांढरकर निलेश शंकरराव
४. मा. भारती फरांदे
५. मा. पाडाळे निता विलास
६. मा. लोखंडे गोरक्ष जाकाराम
७. मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
८. मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
९. मा. कुटे चारुशीला प्रभाकर

याशिवाय मा.गावडे-सहआयुक्त,मा.उल्हास जगताप–नगरसचिव,मा.डोईफोडे,मा.खोसे-सहा.आयुक्त, मा.गाडेकर-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक **१५/०७/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २१)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक : ९१ विषय क्रमांक : १

दिनांक : ०८/०८/२०१६ विभाग **–** अ प्रभाग समिती

सुचक - मा.गोरक्ष लोखंडे अनुमोदक – मा.नीता पाडाळे

संदर्भ:- मा.राजु मिसाळ व मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव...

मा.अ प्रभाग समिती सभा दिनांक १५/०६/२०१६ ठराव क्रमांक २१ नुसार अ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील मैदाने, सभागृहे नागरिकांना, संस्थांना भाडे तत्वावर तात्पुरत्या वापराकरीता म.न.पा.मार्फत दिले जात असतात. मनपातील मा.नगरसदस्यांना विविध कार्यक्रमांकरीता सदरची मैदाने, सभागृहांची अनेक वेळा आवश्यकता असते. परंतु म.न.पा. प्रशासनामार्फत सदरची, मैदाने, सभागृहे संस्थांना अथवा नागरिकांना परस्पर देण्यात येत असल्यामुळे स्थानिक नगरसदस्य त्याबाबत अनभिज्ञ असतात व त्यांना त्यांचे कार्यक्रमांचे नियोजन करताना अडचणी येतात. मनपाचे नुकसान न होता तसेच मा.नगरसदस्य यांना त्यांच्या कार्यक्रमाचे सुनियोजन करता यावे याकरिता मनपा प्रशासनाकडे सदरची मैदाने, सभागृहे भाडे तत्वावर मागणी करणा-या नागरिकांना अथवा संस्थेस मैदाने,सभागृहे भाडेतत्वावर देणेकामी निश्चित

केलेल्या तारखेस सन्मा.नगरसदस्यांनी त्याच कालावधीत मैदाने,सभागृहे भाडेतत्वावर देणेकामी मागणी केल्यास त्याबाबतचे कारण संयुक्तिक व योग्य असल्यास त्यांना प्राधान्याने देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.</u>**

ठराव क्रमांक :९२ विषय क्रमांक : २

दिनांक : ०८/०८/२०१६

सुचक - मा. भारती फरांदे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा.भारती फरांदे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ११ सहाय्यक आयुक्त पदे शासन मंजूर आहेत. त्यापैकी ६ पदे शासनाच्या प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांमधून तर उर्वरित ५ पदे ही महापालिका सेवेतील प्रशासन अधिकारी संवर्गामधून भरण्यात येतात. महापालिका सेवेतील अधिका-यांमधून भरावयाच्या पदांपैकी एक पद अनुसूचित जाती (प्रवर्ग) साठी राखीव असून ते अनेक वर्षापासून रिक्त आहे. सदर रिक्त पदावर अनुसूचित जाती प्रवर्गातील प्रशासन अधिकारी श्री.अण्णा यशवंतराव बोदडे यांना अनुभवाची अट शिथील करुन त्यांचा महापालिका सेवेतील १८ वर्षाचा अनुभव लक्षात घेवून त्यांना सहाय्यक आयुक्त म्हणून पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :९३ विषय क्रमांक : ३

दिनांक : ०८/०८/२०१६

सुचक - मा.निता पाडाळे अनुमोदक – मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ:- मा.निता पाडाळे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.१९ मध्ये स्थापत्यविषयक दुरुस्तीची कामे करणे. (निविदा क्र.५/६७/२०१५-१६) हे काम मे.कृष्णा कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत चालु आहे. सदर कामास र.रु.१६,२७,५००/- इतकी मुळ प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामामध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीचे काम असल्याने सदर कामाची व्याप्ती वाढत असुन त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.३५,००,०००/- (वाढीव र.रु.१८,७२,५००/-) इतकी येत आहे. तरी सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.३५,००,०००/- यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :९४ विषय क्रमांक : ४

दिनांक : ०८/०८/२०१६

सुचक - मा.निता पाडाळे अनुमोदक – मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ:- मा.निता पाडाळे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सर्व प्रभागातील रस्त्यांचे पावसामुळे पडलेले खड्डे व चर भरणेचे काम त्वरीत हाती घेणे आवश्यक आहे. सदर कामाची तातडी व निकड पाहता सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील पान क्र.९४ अनु.क्र.१२१ प्रभाग क्र.१७ मधील अंतर्गत रस्त्यांचे

डांबरीकरण करणे या कामातून अ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सर्व प्रभागातील रस्त्यांचे खड्डे व चर भरणेचे काम करणेस मान्यता देणेत येते आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :९५ विषय क्रमांक : ५

दिनांक : ०८/०८/२०१६

सुचक - मा.निता पाडाळे अनुमोदक – मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ:- मा.निता पाडाळे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.१४ भक्ती शक्ती येथील भागात स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानात म्युरल बसविणेबाबत या भागातील नागरीक वारंवार मागणी करीत आहेत. तरी सदरचे काम करणेकामी स्थापत्य उद्यान विभागात या वॉर्डकरिता जी तरतूद करण्यात आली आहे, ती तरतूद याच प्रभागातील या उद्यानासाठी वापरुन म्युरल बसविण्याचे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :९६ विषय क्रमांक : ६

दिनांक : ०८/०८/२०१६

सुचक - मा.निता पाडाळे अनुमोदक – मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ:- मा.निता पाडाळे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव-

प्रभाग क्र.३ चिखली मध्ये स्वच्छतागृह बांधणे असे नियोजन आहे. तरी सदर प्रभाग क्र.३ मध्ये स्वच्छता गृह बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे सदरचे काम करता येत नसल्यामुळे सन २०१६-१७ ची तरतुद वाया जात आहे. तरी सदर ठिकाणी प्रभाग क्र.३ चिखली मध्ये स्वच्छतागृह ऐवजी सदर कामातून याच प्रभागातील अत्यावश्यक व तातडीची स्थापत्यविषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :९७ विषय क्रमांक : ७

दिनांक : ०८/०८/२०१६

सुचक - मा.नंदा ताकवणे अनुमोदक - मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ:- मा.नंदा ताकवणे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव-

महाराष्ट्र शासनाने मा.आमदारांचे मानधन वाढीचे बाबतीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन्मा.नगरसदस्यांचे सध्याचे मासिक मानधनामध्ये वाढ करुन मासिक मानधन र.रु.५०,०००/- करण्यात यावे. तसेच नगरसेवकांच्या नगरसेवक पदाच्या कार्यकालाप्रमाणे त्यात वाढ करण्यात यावी. तसेच कायद्यातील तरतूदीनुसार असलेल्या मा.पदाधिकारी यांना देखील शासनाकडील लागू करणेत आलेल्या प्रणालीनुसार मा.पदाधिकारी यांचे पदानुसार मानधन निश्चित करण्यात यावे. तसेच माजी नगरसदस्य यांना देखील शासनाकडील लागू करणेत आलेल्या प्रणालीनुसार मासिक पेन्शन योजना चालू करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(नंदा विकास ताकवणे)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/१०/कावि/६३/२०१६
दिनांक : ०८/०८/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.